# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई

## अधिसूचना

### विद्युत अधिनियम, २००३

क्रमांकः मविनिआ/टीआरएफ/एमवायटी-विनियम/**२०१३/०२२३३** - विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहेः-

**१ संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ :**

(१) या विनियमांना, "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (दुसरी सुधारणा) विनियम, **२०१३,**" असे म्हणावे.

(२) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२ विनियम २.१ (२०) (ए) मध्ये सुधारणा**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११ मधील (ज्यास येथून पुढे " बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११" असे संबोधण्यात आले आहे ) विनियम २.१ (२०) (ए) च्या ऐवजी खालील परिच्छेद दाखल करण्यात येईलः-

> "औष्णिक विद्युत निर्मिती केंद्राकरिता घोषित क्षमता म्हणजे, दिवसाच्या कोणत्याही कालावधीसाठी किंवा सबंध दिवसाकरिता अशा विद्युत निर्मिती केंद्राने, इंधन किंवा पाण्याची उपलब्धता यथोचितपणे विचारात घेऊन आणि संबंधित विनियमांमधील, इतर बाबींबरोबरच विनियम ४९.२, आणखी मर्यादेच्या अधीन राहून, अशा विद्युत निर्मिती केंद्राची एक्स-बस मेगावॅटमध्ये वीज पुरविण्याची घोषित केलेली क्षमता.
>
> परंतु असे की, गॅस टर्बाइन विद्युत निर्मिती केंद्र किंवा कम्बाइन्ड सायकल विद्युत निर्मिती केंद्राच्या बाबतीत, विद्युत

निर्मिती केंद्र वायु इंधन व द्रव इंधनावरील संच व मॉड्युलची क्षमता वेगवेगळी घोषित करेल व त्यांचे निर्धारण स्वतंत्रपणे करण्यात येईल. उपलब्धता आणि संयंत्र भार घटक (प्लँट लोड फॅक्टर) यांची अनुक्रमे परिगणना करण्याच्या प्रयोजनासाठी, विद्युत निर्मिती केंद्रासाठी एकूण घोषित क्षमता व एकूण निर्धारित विद्युत निर्मिती ही, वायु इंधन व द्रव इंधनासाठीची घोषित क्षमता आणि निर्धारित विद्युत निर्मिती यांच्या बेरजे इतकी असेल. ”

## ३. विनियम ३५.१ (ए) (एक) मध्ये सुधारणा

बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०११ च्या विनियम ३५.१ (ए) (एक) मध्ये पहिले परंतुक म्हणून, खालील परंतुक दाखल करण्यात येईल:-

“परंतु असे की, विनियम ४९.२ प्रमाणे सर्वोच्च मागणीच्या तासात उच्च क्षमता घोषित करण्याच्या तरतुदीचा लाभ घेणाऱ्या निर्मिती केंद्र/संचाच्या बाबतीत, वर उल्लेख केल्याप्रमाणे अशा निर्मिती केंद्र/संचाकरिता खेळत्या भांडवलाच्या गरजेतील इंधन खर्चाचा भाग, सरासरी घोषित क्षमतेशी संपूर्ण वर्षासाठीच्या मेगवॉटमधील प्रत्यक्ष सरासरी निर्मितीच्या गुणोत्तराने, यथा-प्रमाण तत्त्वावर  कमी करण्यात येईल. ही कपात, निर्मिती कंपनीच्या प्रत्यक्ष कामगिरीची तुलना मान्यता दिलेल्या कामगिरीशी करताना, करण्यात येईल.

उदाहरणार्थ, विनियम ४९.२ मधील समर्थकारी तरतुदींचा लाभ घेणाऱ्या २१० मेगावॉट स्थापित क्षमता असणाऱ्या संचासाठी, दिलेल्या कोणत्याही वर्षात, प्रत्यक्ष सरासरी निर्मिती १९० मेगावॉट असल्यास आणि सरासरी घोषित क्षमता २०० मेगावॉट असल्यास, खेळत्या भांडवलाच्या गरजेतील कोळसा किंवा लिग्नाईटच्या खर्चासाठीच्या भागाचा व गुणक १९०/२०० चा गुणाकार करण्यात येईल.”

## ४ विनियम ४९.२ मध्ये सुधारणा

बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ४९.२ मध्ये पहिले आणि दुसरे परंतुक म्हणून, खालील परंतुक दाखल करण्यात येईल:-

> ‘‘परंतु असे की, औष्णिक निर्मिती केंद्रात इंधन टंचाई झाली तर निर्मिती कंपनी, तिच्याकडून वीज प्राप्त करुन घेणा-या वितरण परवानाधारकाशी विचार-विनिमय करुन, सर्वोच्च मागणी नसतानाच्या तासात इंधनाची बचत करुन सर्वोच्च मागणीच्या तासात अधिक विजेचा पुरवठा करण्याचे प्रस्तावित करु शकेल. निर्मिती केंद्राने/ संचाने त्याच्या निर्मितीचा आणि ऊर्जा क्षमतेचा इष्टतम वापर करावा म्हणून, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र निर्मिती केंद्र/संचासाठी वास्तववादी काल व परिमाण निर्धारण एक दिवस आधी (डे-अहेड) विनिर्दिष्ट करील. अशा प्रसंगी, विनियम २.१ (७) प्रमाणे उपलब्धतेच्या परिगणनेच्या प्रयोजनासाठी घोषित क्षमता ही, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने त्या दिवसाकरिता विनिर्दिष्ट केलेल्या जास्तीत जास्त सर्वोच्च मागणीच्या तासांतील एक्स-पॉवर संयंत्र निर्मितीच्या काल व परिमाण निर्धारणा इतकी विचारात घेण्यात येईल.
>
> परंतु असे की, वरील तरतुदीचा लाभ घेण्यासाठी, र्निर्मिती केंद्र/संच सर्वोच्च मागणीच्या तासांत एका दिवसातील कमीत कमी १२ वेळ-गटांकरिता (टाइम ब्लॉक्स) अशी उच्च क्षमता घोषित करेल.
>
> वरील प्रयोजनासाठी, केंद्रातील प्रमाणकानुसार एकूण उष्मांक दर आणि उपलब्धता लक्ष्य विचारात घेऊन, निर्मिती केंद्र/संचाच्या सात दिवसांच्या परिचालनासाठी विद्युत संयंत्राच्या ठिकाणी आवश्यक असणाऱ्या इंधन साठ्यापेक्षा जेव्हा कमी इंधन साठा असेल, केवळ त्याच वेळी इंधन टंचाई विचारात घेण्यात येईल.
>
> त्याशिवाय, वरील तरतुदीचा उपयोग करणा-या निर्मिती केंद्र/संचाला, तरतुदीच्या उपयोगाची छानननी करण्याकरिता आयोग जी माहिती मागेल ती माहिती

आयोगाला सादर करावी लागेल. ”

## ५ विनियम ४९.८ मध्ये सुधारणा

बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ४९.८ मध्ये पहिल्या परंतुकानंतर दुसरे परंतुक म्हणून खालील परंतुक दाखल करण्यात येईल, जसे की:-

> “परंतु असे की, विनियम ४९.२ नुसार सर्वोच्च मागणीच्या तासांत उच्च क्षमता घोषित करण्याच्या तरतुदीचा लाभ घेणाऱ्या निर्मिती केंद्र/संचाच्या बाबतीत, अशा दिवशी सर्वोच्च मागणी नसतानाच्या तासांतील वीज निर्मितीमधील घट ही, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने निर्मिती कमी करण्याच्या सूचना दिल्यामुळे झालेली वीज निर्मितीमधील हानि म्हणून विचारात घेतली जाणार नाही; मात्र त्यासाठी अशा निर्मिती केंद्राला महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने सर्वोच्च मागणी नसतानाच्या तासांत घोषित क्षमतेपेक्षा कमी वीज निर्मिती करण्याच्या सूचना दिलेल्या असणे आवश्यक आहे.”

## ६ विनियम ५१.१ मध्ये सुधारणा

बहु-वर्षीय वीज दराच्या विनियम, २०११ च्या विनियम ५१.१ मध्ये पहिले परंतुक म्हणून खालील परंतुक दाखल करण्यात येईल, जसे की:-

> “परंतु असे की, विनियम ४९.२ नुसार सर्वोच्च मागणीच्या तासांत उच्च क्षमता घोषित करण्याच्या तरतुदीचा लाभ घेणाऱ्या निर्मिती केंद्र/संचाच्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, सर्वोच्च मागणीच्या तासातील घोषित, निर्धारित आणि सिध्द करुन दाखविलेली क्षमता, संपूर्ण दिवसासाठीची घोषित क्षमता म्हणून स्वीकारेल. अशा प्रकरणांत, विनियम ४९.२ मधील तरतुदीचा लाभ घेणा-या संचाला अशा दिवसांकरिता, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राच्या विनंतीवरुन सर्वोच्च मागणी नसतानाच्या तासांत घोषित क्षमता सिध्द करुन दाखविण्याची आवश्यकता

असणार नाही. तथापि, ज्या निर्मिती केंद्राचा वीज दर प्रत्येक संचाकरिता स्वतंत्रपणे निश्चित न करता तो केंद्र-निहाय निश्चित करण्यात आला असेल, अशा केंद्राने जर विनियम ४९.२ प्रमाणे सर्वोच्च मागणीच्या कालावधीकरिता आणि सर्वोच्च मागणी नसतानाच्या कालावधीकरिता वेग-वेगळ्या क्षमता घोषित करण्याच्या तरतुदीचा लाभ घेतला तर, महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र जेव्हा विनंती करेल तेव्हा अशा निर्मिती केंद्राला त्याची घोषित क्षमता सिध्द करुन दाखववावी लागेल."

७ या विनियमांच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी विनियमांमधील कोणत्याही शब्दांचा/मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्‌भवल्यास आणि/किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील विनियम ग्राह्य धरण्यात येतील.

सचिव,

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

मुंबई ,

१७ फेब्रुवारी, २०१४

**टीप :** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०११, दिनांक ४ फेब्रुवारी, २०११ रोजी शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात आले आहेत. या विनियमांत पहिली सुधारणा, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) (पहिली सुधारणा) विनियम २०११, द्वारे दि. २१ ऑक्टोबर, २०११ रोजी, करण्यात आली.